इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७९/प्राशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट, २००९.

पहा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१, दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:**- शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने **इंग्रजी** माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या पैकी एक समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,१८२ इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबत संस्थेची नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

४. शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/manharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८२०१९३२४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.ऊ. रौराळे )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण),यांचे खाजगी सचिव,
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,
अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.३५९/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २७ जून, २०१९

प्रस्तावना :- खेड तालुका विद्याविकास प्रतिष्ठाण, वराळे,ता.खेड,जि.पुणे संचलित लर्निंग ट्री इंग्लिश मिडीअम स्कुल,वराळे,ता.खेड,जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत खेड तालुका विद्याविकास प्रतिष्ठाण, वराळे,ता.खेड,जि.पुणे संचलित लर्निंग ट्री इंग्लिश मिडीअम स्कुल,वराळे,ता.खेड,जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) अशी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यासाठी खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती-

१) सदर संस्थेने अतिरिक्त रुपये १५०००/- इतक्या रकमेचे चलन, अद्ययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्र, सन २०१६-१७ च २०१७-१८ चे लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती तसेच इयत्ता १ ली ते ८ वीचे आरटीई नमुना-२ प्रमाणपत्राची अद्ययावत प्रत संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पुर्तता न केल्यास शाळेची मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.

२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून

Scanned by CamScanner

अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२७.०६.२०१९

(रा.वि.कुडले)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे ,
६. शिक्षणाधिकारी,जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), पुणे.

Scanned by CamScanner